जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2025

तरुण भारत

# डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्तीसाठी ११ लाखांची देणगी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राजाराम महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्राच्या दिवंगत प्राध्यापिका डॉ. शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यासाठी त्यांचे पती अशोक जाधव यांनी शिवाजी विद्यापीठास ११ लाख रुपयांची देणगी दिली.



**कोल्हापूर : शिष्यवृत्तीसाठी ११ लाखांचा देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपुर्द करताना अशोक जाधव. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. विजय ककडे, एस. पी. वेलचे, अनिल पाटील, सर्जेराव पाटील, राजेश गायकवाड, उदय टिकेकर आदी.**

अशोक जाधव यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे ११ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. सूक्ष्मजीवशास्त्र या विषयात पदवी स्तरावर सर्वोत्कृष्ट गुणवत्तापूर्ण कामगिरी बजावणाऱ्या दोन विद्यार्थिनी आणि एक विद्यार्थी यांना शोभना जाधव यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे. कुलगुरूंच्या हस्ते जाधव यांचा ग्रंथ, शाल आणि विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दुर्गाली गायकवाड, भगवान महावीर अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, एस. पी. वेलचे, अनिल पाटील, सर्जेराव पाटील, राजेश गायकवाड, उदय टिकेकर, तेजराज पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2025
सकाळ

# धैर्य, आत्मविश्वास अंगी बानवा : डॉ. पाटील

## विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात 'होस्टेल डे'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहात 'होस्टेल डे' कार्यक्रमात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

कोल्हापूर, ता. २८ : विद्यार्थिनींनी यशापर्यंत पोहोचण्यासाठी चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन, धैर्य आणि आत्मविश्वास हे गुण अंगी बानवावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या 'होस्टेल डे' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत केले. अधीक्षक डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
29 MAR 2025
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्वांटम संगणक काही क्षणांत सोडवणार समस्या : प्रा. जोग

कोल्हापूर, ता. २८ : 'पारंपरिक संगणकांना हजारो वर्षे लागू शकतात, अशा समस्या क्वांटम संगणक काही क्षणांत सोडवणार आहे. भविष्यात हवामान अंदाज, प्रोटिन डिझाईन, सायबर सिक्युरिटी, शेअर मार्केट, औषधनिर्मिती, मशीन लर्निंग आणि अनेक इतर गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला जाईल', असे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रमोद जोग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभाग आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्सतर्फे आयोजित 'क्वांटम संगणक आणि क्वांटम माहिती' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रमोद पाटील होते. प्रा. जोग यांनी क्वांटम गेटस् व सर्किटस् यांच्या संकल्पनेवर सखोल माहिती दिली. त्यांनी जपानी शास्त्रज्ञ मायोराना यांच्या संकल्पनेवर आधारित प्रकल्पांचे यश आणि त्यातून मिळणाऱ्या संभावनांचा उल्लेख केला.

प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी, क्वांटम संगणकामुळे समस्यांचे निराकरण जलद आणि अचूक पद्धतीने करता येणार आहे. आयएपीटीने समाजासाठी दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे सांगितले. यावेळी प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, आर. के. निमत, एल. डी. जाधव, ए. बी. साळुंखे, एन. एल. तरवाल, एस. पी. दास, व्ही. एस. कुंभार, एम. आर. वायकर, एस. एस. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2025
लोकमत

# 'अहिल्यादेवी होळकर महिला सक्षमीकरणाचे आदर्श उदाहरण'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य म्हणजे महिला सक्षमीकरणाचे आदर्श उदाहरण आहे, असे प्रतिपादन लेखिका वीनिता तेलंग यांनी केले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे बुधवारी विद्वत्ता परिषद आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाले. प्रथम सत्रात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य व महिला सबलीकरण' विषयावर त्या बोलत होत्या. अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे अध्यक्षस्थानी होते.

वीनिता तेलंग म्हणाल्या, अहिल्यादेवींनी केवळ धार्मिक कार्य केले नसून, त्याबरोबरीने अनेक लोककल्याणकारी कामेही केली. महिला सक्षमीकरणाचे त्या प्रतीक होत्याच; पण त्यांच्यामुळे राज्यातील इतर महिलांसाठीही त्यांचे कर्तृत्व प्रेरणादायी ठरले. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे राजकीय, सामाजिक धोरण व प्रशासकीय कार्य' या विषयावर सुखदेव थोरात यांचे व्याख्यान झाले. सांस्कृतिक कार्य विभागाचे चंद्रकांत पाटील यांनी स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2025
तरुण भारत

# नवीन शैक्षणिक धोरणात ग्रंथालयांची भूमिका महत्वाची : डॉ. सुतार

**इचलकरंजी :** जयवंतराव आवळे शिक्षण प्रसारक मंडळाच्या जयवंत महाविद्यालयात 'अग्रणी महाविद्यालय योजना' अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेच्या 'ग्रंथालय आणि नवीन शैक्षणिक धोरण'वर मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान संसाधन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी, नवीन शैक्षणिक धोरणात ग्रंथालयांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन केले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात डॉ. विकास परांजपे यांनी आतापर्यंतच्या शैक्षणिक धोरणांचा आढावा घेतला. द्वितीय सत्रात डॉ. सुतार यांनी ग्रंथालयांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून अद्ययावत सेवा द्याव्यात आणि विद्यार्थ्यांच्या वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत, असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलावर जमादार यांनी नवीन अभ्यासक्रमानुसार शिक्षकांनीही अद्ययावत राहून विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेस विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, ग्रंथपाल, प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेचे नियोजन प्रा. सुनील बुढेढ यांनी केले. प्रास्ताविक डॉ. वसंत भागवत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. उज्ज्वला चौगुले यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAR 2025

पुण्यनगरी



# कबड्डीत डॉ. जे. जे. मगदूम इंजि. अजिंक्य

**जयसिंगपूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत लीड कॉलेज कबड्डी स्पर्धेत डॉ. जे. जे. मगदूम इंजिनिअरिंगच्या महिला संघाने अजिंक्यपद, तर पुरुष संघाने उपविजेतेपद पटकावले. स्पर्धेचे आयोजन लीड कॉलेज अंतर्गत वारणानगर येथे करण्यात आले होते. स्पर्धेत मुलींचे व मुलांचे क्रमशः सहा व नऊ संघ सहभागी झाले होते. मुलींच्या गटात चुरशीच्या लढती झाल्या. स्पर्धेत अंतिम लढतीमध्ये तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेजवर मात करून मगदूम इंजिनिअरिंगच्या महिला संघाने मनाली पास्ते हिच्या नेतृत्वाखाली अजिंक्यपद पटकावले. तर मुलांच्या कबड्डी संघामध्ये प्रज्वल गस्तेच्या नेतृत्वाखाली उपविजेतेपद पटकावले. विजेत्या संघांना प्रा. नवनाथ पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले. ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील आडमुठे, प्राचार्य डॉ. गोपाळ मुलगुंद, डीन स्टुडंटस् प्रा. पी. पी. पाटील यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.